जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १२६ दिनांक - २२/०२/२०२५**

गुन्हे शाखा युनिट २,पुणे शहर

# रेकार्डवरील सराईत गुन्हेगारास पिस्टल व काडतुसह केले जेरंबद

दि.२०/०२/२०२५ रोजी युनिट २ कडील अधिकारी व अमंलदार हे युनिट चे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना **पोलीस अंमलदार उज्वल मोकाशी व शंकर कुंभार** यांना बातमी मिळाली की डायसप्लॉट गुलटेकडी स्वारगेट पुणे येथील कॅनालजवळ एक इसम अग्निशस्त्र घेवुन थांबलेला आहे.

बातमीप्रमाणे युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट कडील सपोनि आशिष कवठेकर व त्याचे पथकाने मिळालेल्या बातमीप्रमाणे डायसप्लॉट गुलटेकडी स्वारगेट पुणे येथ्रील संशयित इसमास ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारला असता,त्याने त्याचे नाव **ओंकार बाळु मावास वय २१ वर्ष रा.श्री लक्ष्मी प्रोजेक्ट स्टोअर किराणा मालाचे दुकानामागे गुलटेकडी डायसप्लॉट मार्केट यार्ड पुणे** असे सांगीतले. नमुद पथकाने मिळून आलेल्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याचेकडे ४०,४००/-रु. एक सिल्व्हर रंगाचे लोखंडी पिस्टल मॅगझीनसह व एक जिवंत काडतुस मिळुन आले. त्याबाबत **स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि.कमांक ५३/२०२५ भारताचा हत्याराचा कायदा कलम ३(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(२)(३) सह १३५** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीस गुन्हयात अटक करुन पुढील तपास स्वारगेट पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री गणेश इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर,सपोनि अशिष कवठेकर, अमोल रसाळ पोलीस अंमलदार उज्वल मोकाशी, शंकर कुंभार, संजय जाधव, साधना ताम्हाणे, विजय पवार, पुष्पेंद्र चव्हाण, व नागनाथ राख यांनी केली.